अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचे कार्यालय, ९१
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ४०० ०३०
दुरध्वनी क्र. २४९२१२१२, २४९२२६१८
E-mail addlcpacbmumbai@mahapolice,gov.in
दिनांक :- १९/०५/२०२६

**-: प्रेसनोट :-**

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गु.र.क्र | १३/२०२६ |
| कलम | कलम ७, १२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपी लोकसेवक | १) वसवराज स्वामीनाथ धामगुंडे, पो.ह.क्र. ०६०६७७, खार पोलीस ठाणे, मुंबई<br>२) संजित कुमार, खाजगी इसम |
| लाचेची मागणी | रू. २,०००/- तडजोडीअंती रू. १,०००/- |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रू. १,०००/- |
| थोडक्यात हकीगत | यातील तक्रारदार यांचे मुलीचा पासपोर्ट काढण्याच्या कामासंदर्भात खार पोलीस ठाणे, मुंबई येथील लोकसेवक वसवराज स्वामीनाथ धामगुंडे, पो.ह.०६०६७७ यांनी तक्रारदार यांचेकडे रू. २,०००/- लाचेची मागणी करून तडजोडीअंती रू. १,०००/- लाचेची मागणी केली. परंतु तक्रारदार यांना लोकसेवकाला लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक १८/०५/२०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे समक्ष हजर राहून तक्रार दिली.<br>प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १८/०५/२०२६ रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक वसवराज धामगुंडे यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांचे मुलीच्या पासपोर्ट कामाच्या संदर्भात रू. २,०००/- लाचेची मागणी करून तडजोडीअंती रू. १,०००/- लाच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार तात्काळ करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांनी लाचेची रक्कम मो/सा. क्र. एमएच ०१ ईडी ८१०० च्या पुढील कप्यात ठेवण्यास सांगितले. तसेच लोकसेवक यांचे सांगण्यावरून खाजगी इसम संजित कुमार यांनी सदरहू लाचेची रक्कम काढून घेवून स्वतःच्या ताब्यात ठेवली. नमूदवेळी खाजगी इसम संजित कुमार यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहाथ पकडण्यात आले आहे. म्हणुन उपरोक्त नमूद लोकसेवक व खाजगी इसम यांच्याविरूध्द भ्र.प्र. अधि. १९८८ चे कलम ७, १२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

**सापळा अधिकारी :- श्रीमती रेखाबाई दुधभाते, पोलीस निरीक्षक** **पर्यवेक्षक अधिकारी:- श्री. सुनिल हारूगडे, सहाय्यक पोलीस आयुक्त**

मार्गदर्शक अधिकारी- श्री. संदिप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

१९/०५/२६

( अजित मुळे )
सहाय्यक पोलीस आयुक्त(प्रशासन),
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
टोलफ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
व्हॉट्सअप क्र. :- 8828241064 मोबाईल ॲप :- www.acbmaharashtra.net
वेबसाईट :- acbmaharashtra.gov.in, acbwebmail@mahapolice.gov.in
ईमेल :- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
फेसबुक :- www.facebook.com - Maharashtra ACB

Scanned with OKEN Scanner